प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**मराठी विभाग**

# मावळ, खेड

# भाषाक्षेत्रातही करिअरच्या उत्तम संधी : प्रा. डॉ. कसबे

। राजगुरुनगर प्रतिनिधी।

**भाषा** ही सुसंवादासाठी व ज्ञानवृध्दीसाठी असून जर आपण काही भाषिक कौशल्य आत्मसात करून भाषेवर प्रभुत्व स्थापित केले तर भाषाक्षेत्रातही करिअरच्या उत्तम संधी असल्याचे प्रतिपादन चाकणच्या कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप कसबे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय वर्ष मराठी विशेषस्तरावर अभ्यासनाऱ्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी 'भाषाक्षेत्रातील संधी' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. बी. डी. अनुसे, प्रा. व्ही. व्ही. कांबळे आणि मराठीचे द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील व प्रा. दिलीप मुळूक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांसह मोनिका तिटकारे, वृषाली शितोळे, देवयानी मघाडे, दिगंबर गायकवाड या विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून मराठी विभागास कवी कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट देण्यात आली. प्रास्ताविक उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन विद्या खुरपे हिने केले तर आभार डॉ. बी. डी. अनुसे यांनी मानले.

## संवाद कौशल्ये आत्मसात करावित

» डॉ. कसब म्हणाले, आपल्याकडे प्रतिभा, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता हे गुण असतील तर शिक्षकीपेशासह निवेदक, पत्रकारिता, अनुवादक, जाहिरातलेखक,



मुद्रिकशोधक, पटकथा– संवादलेखक, व्याख्याता, कथाकथन, काव्यगायन असे अनेक पर्याय करिअरसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी मराठीचा अभ्यासक्रमही काळानुरूप असायला हवा. मराठी भाषा ही फक्त अभिमानासाठी न राहता हितसंबंधासाठी असायला हवी कारण नुसते भाषेच्या अभिमानावर पोट भरत नाही. चरितार्थ, व्यवसाय म्हणून भाषेत करिअर करायचे असेल तर संवाद कौशल्यांसारखी इतर भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

दै. सकाळ १२ मार्च २०१८

# भाषेतही करिअर शक्य : डॉ. कसबे

राजगुरुनगर, ता. ११ : "भाषा ही सुसंवादासाठी व ज्ञानवृद्धीसाठी असून, जर आपण काही भाषिक कौशल्य आत्मसात करून भाषेवर प्रभुत्व स्थापित केले, तर भाषाक्षेत्रातही करिअर होऊ शकते," असे मत चाकणच्या कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप कसबे यांनी व्यक्त केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात तृतीय वर्ष मराठी विशेषस्तरावर अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी 'भाषाक्षेत्रातील संधी' या विषयावर बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. बी. डी. अनुसे, प्रा. व्ही. व्ही. कांबळे आदी उपस्थित होते.

डॉ. कसबे म्हणाले, "भाषेत करिअर करायचे असेल तर संवाद कौशल्यांसारखी इतर भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे. आपल्याकडे प्रतिभा, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता हे गुण असतील तर शिक्षकीपेशासह निवेदक, पत्रकारिता, अनुवादक, जाहिरातलेखक, मुद्रितशोधक, पटकथा- संवादलेखक, व्याख्याता, कथाकथन, काव्यगायन असे अनेक पर्याय करिअरसाठी उपलब्ध आहेत." या वेळी मोनिका तिटकारे, पूनम शितोळे, वैष्णवी मल्हारे, दिपाली गायकवाड या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून मराठी विभागास कवी कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट देण्यात आली. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. विद्या खुरपे हिने सूत्रसंचालन केले. डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.


राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाला 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट देताना विद्यार्थी.



# भाषा ही सुसंवाद, ज्ञानवृद्धीसाठी

## हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात प्रा. डॉ. दिलीप कसबे यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - भाषा ही सुसंवादासाठी व ज्ञानवृद्धीसाठी असून जर आपण काही भाषिक कौशल्य आत्मसात करून भाषेवर प्रभुत्व स्थापित केले, तर भाषाक्षेत्रातही करिअरच्या उत्तम संधी असल्याचे प्रतिपादन चाकणच्या कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप कसबे यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात तृतीय वर्ष मराठी विशेषस्तरावर अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी 'भाषाक्षेत्रातील संधी' या विषयावर प्रा. डॉ. कसबे बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. बी. डी. अनुसे, प्रा. व्ही. व्ही. कांबळे आणि मराठीचे द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. दिलीप कसबे म्हणाले की, आपल्याकडे प्रतिभा, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता हे गुण असतील तर शिक्षकीपेशासह निवेदक, पत्रकारिता, अनुवादक, जाहिरातलेखक, मुद्रितशोधक, पटकथा-संवादलेखक, व्याख्याता, कथाकथन, काव्यगायन असे अनेक पर्याय करिअरसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी मराठीचा अभ्यासक्रमही काळानुरूप असायला हवा. मराठी भाषा ही फक्त अभिमानासाठी व राजकीय हितसंबंधासाठी असायला नको कारण नुसते भाषेच्या अभिमानाने पोट भरत नाही. नोकरी, व्यवसाय म्हणून भाषेत करिअर करायचे असेल, तर संवाद कौशल्यासारखी इतर भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तर तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून मराठी विभागास कवी कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट देण्यात आली. प्रास्ताविक उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन विद्या खुरपे तर आभार डॉ. बी. डी. अनुसे यांनी मानले.


राजगुरुनगर: तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून मराठी विभागास कवी कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट देण्यात आली.



केसरी पुणे, १४ मार्च २०१८ ३

**भाषाक्षेत्रातही करिअरच्या संधी - डॉ. कसबे**

राजगुरुनगर, (वार्ताहर) : भाषा ही सुसंवादासाठी व ज्ञानवृद्धीसाठी असून जर आपण काही भाषिक कौशल्य आत्मसात करून भाषेवर प्रभुत्व स्थापित केले तर भाषाक्षेत्रातही करिअरच्या उत्तम संधी असल्याचे प्रतिपादन चाकणच्या कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप कसबे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय वर्ष मराठी विशेषस्तरावर अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी 'भाषाक्षेत्रातील संधी' या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. बी. डी. अनुसे, प्रा. व्ही. व्ही. कांबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांसह मोनिका तिटकारे, वृषाली शितोळे, देवयानी मावळे, दिगंबर गायकवाड यांनी आपली मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन विद्या खुरपे या विद्यार्थीनीने केले. तर आभार डॉ. बी. डी. अनुसे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख